# नियमित दिवाणी मुकदमा नं.८१/१९८३
## निशाणी ३१६अ खालील आदेश
**CNR.No.MHSI06-000006-1983**

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१३ब ते १३फ तर्फे दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम.१३ नियम ७(३) अन्वये दाखल करणेत आलेला आहे. प्रस्तुत प्रतिवादी यांच्या मते प्रस्तुतकामी निशाणी १६५/१ लगत प्रस्तुत प्रतिवादी यांनी कै.बाबाजी सखाराम पेडणेकर यांस कै.केशव शिवराम मुळीक वगैरे ३ यांनी लिहून दिलेला दि.२१/०३/१९४२ रोजीचे मोडीलिपीतील गहाणखत हजर केलेले आहे व त्यासोबत विठ्ठल आत्माराम केसकर यांनी त्याचे केलेले मराठीत भाषांतर हजर केलेले असून त्यावर त्यांची सही आहे. विठ्ठल आत्माराम केसकर हे मयत आहेत. दि.१६/१२/२०२३ रोजी प्रस्तुत प्रतिवादी यांनी आपला पुरावा सादर करतेवेळेस वादीतर्फे विधिज्ञ यांनी नि.१६५/१ लगत सादर केलेले मोडीचे मराठी भाषांतरास निशाणी देणेस हरकत घेतली त्यामुळे न्यायालयाने त्यास निशाणी दिलेली नाही. वादीने सदर दिनांक २१/०३/१९४२ रोजीचे मोडीचे मराठी भाषेतील गहाणखत मान्य नाही असे कथन केलेले आहे. सबब, प्रस्तुत प्रतिवादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम १३ नियम ७(३) अन्वये वादीने मराठी भाषांतराची प्रत हजर करणेबाबत आदेश होणेकरीता विनंती केलेली आहे.

२. प्रस्तुत अर्जास वादीने निशाणी ३२१ लगत म्हणणे दाखल केलेले असून वादीच्या अर्जातील कथनांचा स्पष्टपणे इन्कार केलेला आहे. वादीच्या मते, सदरचा अर्ज हा प्रतिवादीने प्रदीर्घ विलंबाने दाखल केलेला असलेने तो चालणेस पात्र नाही.

३. प्रतिवादी नं. १३ब ते १३फ तर्फे विधिज्ञ तसेच वादीतर्फे विधिज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला.

४. प्रस्तुत प्रकरणाचा अभिलेख पाहता दि. १६/१२/२०२३ रोजी प्रतिवादी क्र.१३ब ते १३फ तर्फे साक्षीदार क्र.१ यांचा सरतपास नोंदविणेत आलेला आहे. सदर सरतपास नोंदवितेवेळेस

प्रस्तुत प्रतिवादीतर्फे विधिज्ञ यांनी साक्षीदारांस निशाणी १६५/1 लगत दाखल केलेला मुळ गहाणपट्टा व त्यासोबत हजर केलेली भाषांतरीत प्रत दाखविलेली होती. तथापि मुळ गहाणपट्टा हा मोडी भाषेत नमूद आहे. त्यामुळे त्यामध्ये नेमका काय मजकूर नमूद आहे हे स्पष्ट झालेले नसलेमुळे या न्यायालयाने भारतीय पुरावा कायदा कलम ९० नुसार सदर दस्तास निशाणी अथवा आर्टीकल देणेबाबतची प्रस्तुत प्रतिवादी यांची विनंती प्रस्तुत साक्षीदाराचा सरतपास नोंदवितेवेळेस सदर कारणमिमांसा नोंद करुन नाकारलेली आहे. तसेच मुळ गहाणपट्टयासोबत हजर केलेल्या भाषांतरीत प्रतीस देखील निशाणी देणेत आलेले नव्हते. तथापि, सदर मुळ व भाषांतरीत गहाणखत प्रत साक्षीदारास दाखविणेत आलेली होती.

५. दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम १३ नियम ७(३) (मुंबई दुरुस्ती) अन्वये न्यायालयीन भाषेखेरीज अन्य भाषेतील कागदोपत्री पुरावा हा पुराव्याचे कामी दाखल (Admitted) केला गेलेला असलेस विरोधी पक्षाने सदर कागदोपत्री पुराव्यातील मजकूर मान्य करावा अथवा स्वतःचे लिप्यंतरीत प्रत हजर करावी अशी तरतूद नमूद आहे.

६. प्रस्तुतकामी वादीने प्रस्तुत प्रतिवादीचा सरतपास नोंदवितेवेळेस प्रस्तुत कागदपत्रांना निशाणी देणेस हरकत नोंदविलेली आहे. प्रस्तुतचा कागदोपत्री पुरावा हा अद्याप सिद्ध झालेला नाही. तथापि प्रस्तुत कागदपत्रके प्रतिवादी तर्फे साक्षीदार यांना सरतपासादरम्यान दाखविणेत आलेला असलेमुळे तो पुराव्याच्याकामी समाविष्ट झालेला आहे. वादीने सदर निशाणी १६५/१ लगत दाखल असणारे मोडी भाषेतील व मराठी भाषेतील गहाणखतातील मजकूरास आव्हान नोंदविलेले आहे. प्रस्तुत प्रतिवादीतर्फे साक्षीदार यांचे सरतपासादरम्यान मोडी भाषेतील दस्ताचे लिप्यंतर करणारे विठ्ठल आत्माराम केसरकर हे मयत झालेले आहेत हे अभिलेखावर नोंद झालेले आहे. प्रस्तुत प्रतिवादी यांनी त्यांचे कैफियतीमध्ये सदर गहाणखताचा उल्लेख केलेला आहे. वादीतर्फे हजर करणेत आलेले

न्यायनिर्णय म्हणजे ***1] Bama Kothari Patil Vs. Rohidas Arjun Madhavi & Anr. 2004(2) ALL MR 290** 2] **Bharat R.Desai & Anr. Vs. Naina Mohanlal Bhal 2004(2) ALL MR 291** 3] **Dr. Manish Pralhad Bhosale Vs. State of Maharashtra & Ors. 2004(2) ALL MR** 295* या न्यायनिर्णयातील प्रमाण सद्य परिस्थितीत त्या प्रकरणांस लागू होणारे नाही. अशा परिस्थितीमध्ये वादी व प्रतिवादी यांचे दरम्यानचे वाद अंतिमतः निर्णयीत करणेकरीता वादीने सदर दि.२१/०३/१९४२ रोजीचे मोडी भाषेतील गहाणखताचे लिप्यंतर सादर करणेबाबत आदेश करणे आवश्यक वाटत आहे. सबब न्यायाचे कारणास्तव मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**–::आदेश::–**

**१.** अर्ज अंशतः मंजूर करणेत येत आहे.

**२.** वादीने सदर आदेशापासून १५ दिवसांच्या आत निशाणी १६५/१ लगत दाखत असणारे दि.२१/०३/१९४२ रोजीचे मोडी भाषेतील गहाणखताची मराठी भाषेतील लिप्यंतरीत प्रत न्यायालयात सादर करणेची आहे.

**३.** प्रतिवादी क्र. १३ब ते १३फ यांनी पुढील नेमले तारखेस न चुकता वादीकरीता निशाणी १६५/१ लगत सादर केलेल्या मोडी भाषेतील गहाणखताची सत्यप्रत उपलब्ध करुन देणेची आहे.

**४.** खर्चाबाबत आदेश नाही.

सही/–

( दुर्गा प्र.पुजारी )

दिनांकः–३१/०१/२०२४.

दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),सावंतवाडी